# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक ११/०२/२०२५ चे ठराव**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८४५** **विषय क्रमांक - ८४५**

**दिनांक - ११/०२/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८४५<br>दिनांक -<br>११/०२/२०२५ | मा.क्षेत्रीय अधिकारी, आरोग्य अ क्षेत्रीय यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/आ/२/कावि/५५/२०२५ दि.२७/०१/२०२५ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४८१४ दि.२८/०१/२०२५ अन्वये, शहरातील वापरात नसलेले अथवा दुरावस्थेत अथवा मोडकळीस अवस्थेत (Dialpted Condition) असणारे सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांचा सर्व्हे करुन निष्कासित करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८४५<br>दिनांक -<br>११/०२/२०२५ | मा.क्षेत्रीय अधिकारी, आरोग्य अ क्षेत्रीय यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/आ/२/कावि/५५/२०२५ दि.२७/०१/२०२५ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४८१४ दि.२८/०१/२०२५ अन्वये, स्वच्छ महाराष्ट्र / भारत अभियान (नागरी) प्रकल्प अंमलबजावणी कक्षाकडील मा.आयुक्त सो. यांचे स्वमअक/३/कावि/१५५/२०२३, दिनांक-१६/१०/२०२३ आदेशान्वये कळविलेनुसार केंद्र शासनाचे स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविणेत येत आहे. नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे आणि सर्व नागरिकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर सर्वेक्षणामध्ये दरवर्षी सहभागी होत असते. मा. आयुक्त सो. यांनी सार्वजनिक व सामुदायिक शौचालय आढावा बैठकीमध्ये वेळोवेळी सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांचा सर्वे करून वापरात नसलेले शौचालय निष्कासित करण्याचे निर्देश दिलेले आहे. स्वच्छ सर्वेक्षणातील ओडीएफ, ओडीएफ++, वॉटर+ याकरिता सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांच्या स्वच्छतेचे मुल्यांकन करण्यात येते. शहरातील एकुण सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांपैकी काही शौचालये ही सिटी प्रोफाईलमध्ये नोंदविणेत आलेली आहेत. त्यामुळे शहरातील जी सार्वजनिक अथवा सामुदायिक शौचालये ज्यांचा अजिबातच वापर होत नाही अथवा दुरावस्थेत अथवा मोडकळीस अवस्थेत (Dialpted Condition) आलेली आहेत त्यांचा सर्व्हे करून सदर शौचालये निष्कासित करणे आवश्यक आहे. त्यानुसार "अ" क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील जी सार्वजनिक अथवा सामुदायिक शौचालये ज्यांचा अजिबातच वापर होत नाही अथवा दुरावस्थेत अथवा मोडकळीस अवस्थेत (Dialpted Condition) आलेली आहेत त्यांचा सर्व्हे स्थापत्य विभागामार्फत करणेत आला असून त्यानुसार त्यांनी पत्र क्र. अक्षे/स्था/कावि/१९/२०२५ दि.२३/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये खालील यादीमधील सार्वजनिक अथवा सामुदायिक शौचालये अजिबातच वापर होत नाही अथवा दुरावस्थेत अथवा मोडकळीस अवस्थेत (Dialpted Condition) आहेत. |

| अ.क्र. | प्रभाग क्र. | ब्लॉक संख्या | सिट्स संख्या | शौचालयाचे ठिकाण | निष्कासित करणेचे कारण | जागेचा वापर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १० | २ | ७ | गांधीनगर लोखंडे भवन साईड CT (पुरूष) + मुतारी (महिला) | मोडकळीस आल्याने वापर होत नाही. तसेच २५० मीटर अंतरावर नवीन शौचालय आहे. | ज्येष्ठ नागरीकांसाठी कट्टा याचे नियोजन |
| २ | १० | १ | ८ | मोरवाडी कांता रेसिडन्सी समोर | मोडकळीस आल्याने वापर होत नाही तसेच १ मीटर अंतरावर पर्यायी शौचालय उपलब्ध आहे. | स्वच्छता गृहासाठी पाण्याच्या टाकीचे नियोजन |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १० | २ | ४ | एच.डी.एफ.सी कॉलनी, समोरील PT शौचालय (पुरूष/महिला मुतारी) | बंदिस्त असल्याने वापर होत नाही तसेच ५०० मीटर अंतरावर दुसरे सार्वजनिक शौचालय उपलब्ध आहे. | रस्त्याने बाधित |
| ४ | १० | २ | ४ | बाबर वजन काटा विद्यानगर CT मुतारी शौचालय / शौचालय महिला / पुरूष) | मोडकळीस आल्याने वापर होत नाही तसेच ५ मीटर अंतरावर सुलभ शौचालय उपलब्ध आहे. | रस्त्याने बाधित |
| ५ | १० | १ | २ | थरमॅक्स चौक संभाजीनगर मुतारी (पुरूष) | मोडकळीस आल्याने वापर होत नाही. तसेच १०० मीटर अंतरावर नवीन सार्जनिक शौचालय आहे. | रस्त्याने बाधित |
| ६ | १० | १ | २ | संघवी केसरी कॉलेज जवळ मुतारी (पुरूष) | मोडकळीस आले आहे त्यामुळे वापर होत नाही. | रस्त्याने बाधित |
| ७ | १४ | १ | २ | उभा मारूती च्या मागे आरोग्य ऑफिस च्या शेजारील मुतारी (पुरूष) | सदर युरिनल पुर्ण तुटलेली असून वापर होत नाही तसेच ०५ फुट अंतरावर सार्जनिक शौचालय आहे. | फुटपाथने बाधित |
| ८ | १४ | १ | २ | परशुराम चौक मुतारी (पुरूष) | सदर युरिनल पुर्ण तुटलेली असून वापर होत नाही तसेच ३० फुट अंतरावर नविन सार्जनिक शौचालय आहे. | रस्त्याने बाधित |
| ९ | १४ | १ | ४ | बॉम्बे सिलेक्शन जवळील मुतारी काळभोरनगर (महिला/पुरूष) | सदर युरिनल पुर्ण तुटलेली असून वापर होत नाही. | अरूंद जागा |
| १० | १४ | १ | २ | चिंचवड स्टेशन येथील शितल हॉटेल जवळील मुतारी | मोडकळीस आल्याने वापर होत नाही तसेच १५० फुट अंतरावर पर्यायी शौचालय उपलब्ध आहे. | रस्त्याने बाधित |
| ११ | १४ | १ | २४ | सुदर्शननगर नाल्याजवळ आकुर्डी म्हाळसाकांत रोड आकुर्डी | सदरचे शौचालय मोडकळीस आले असून त्याचा वापर होत नाही. | नाला व रस्त्याने बाधित |
| १२ | १९ | १ | २ | लोकमान्य हॉस्पिटल जवळील मुतारी २ | जवळ दुसरे शौचालय असल्याने त्याचा वापर होत नाही. | रस्त्याने बाधित |
| एकूण | | १५ | ६३ | | | |

उक्त प्रमाणे ‘अ क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील मनपा शौचालये निष्कासित करावयाची असून आरोग्य मुख्य कार्यालय यांचेकडील पत्र क्र.स्वमअक/३/कावि/१४२/२०२४, दि.१९/१२/२०२४ अन्वये कळविलेनुसार महापालिकेच्या जागेवरील CT/PT/Urinals निष्कासित करणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८४६** **विषय क्रमांक - ८४६**

**दिनांक - ११/०२/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८४६<br>दिनांक -<br>११/०२/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.बक्षेका/वि/कावी/४८/२०२५ दि.०४/०२/२०२५<br>आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४९१६ दि.०४/०२/२०२५ अन्वये, मनपाचे ब क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत नवीन तालेरा हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन थिएटर करिता विद्युत विषयक तसेच मेडीकल गॅस पाईप लाईन व इतर अनुषंगिक कामे करणेस मान्यता देणे बाबत. |

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८४६<br><br>दिनांक -<br><br>११/०२/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.बक्षेका/वि/कावी/४८/२०२५ दि.०४/०२/२०२५<br><br>आणि मा.स्थायी समिति अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४९१६ दि.०४/०२/२०२५ अन्वये, मनपाचे ब क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत नवीन तालेरा हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन थिएटर करिता विद्युत विषयक तसेच मेडीकल गॅस पाईप लाईन व इतर अनुषंगिक कामास मा.महापालिका सभा ठराव क्र.५४० दिनांक.०६.०२.२०२४ अन्वये र.रु.१३ कोटी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सदर कामाअंतर्गत निविदा क्र.५५-०१/२०२३-२४ अन्वये र.रु.१०,५३,७०,५००/- रकमेची निविदा काढणेत आली आहे. आदेश क्र.वि.मुका/५/कावि/३३९/२०२४ दिनांक.०१/०८/२०२४ अन्वये मे.फार्मडील मार्फत ऑपरेशन थिएटर व मेडीकल गॅस पाईप लाईन इ. चे काम चालू असून सदर कामाची मुदत दि.३१/०१/२०२५ पर्यंत आहे. सदर कामासाठी मे.शिंदे असोसिएटस यांची सल्लागार म्हणून निविदा रक्कमेच्या १.९% इतक्या दराने व आदेश क्र.वि/मुका/८/कावि/५१०/२०२३ दि.२७/१२/२०२३ अन्वये नियुक्ती करणेत आलेली आहे. याकरिता आजअखेर र.रू.११,२४,२२,५३३/- (सल्लागार फी सह) इतका खर्च झालेला आहे. सदर कामाअंतर्गत होणा-या वाढीव कामाकरिता अंदाजे र.रु.५८,५०,२४३/- इतका खर्च अपेक्षित आहे वरील नमूद बाबींचा मूळ अंदाजपत्रकात समावेश नसल्याने सबब एकूण नि.र.रू.११,१२,२०,७४३/- (मूळ निविदा र.रु.१०,५३,७०,५००/- + वाढीव खर्च र.रु.५८,५०,२४३/-) तांत्रिक मान्यता एकूण र.रु.१३,१९,१०,०२६/- (र.रू.१२,९७,९६,८३१/- (GST सह), सल्लागार फी सह) इतका खर्च अपेक्षित आहे. सबब र.रु १३.४० कोटी या सुधारित रक्कमेस मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८४७** **विषय क्रमांक - ८४७**

**दिनांक - ११/०२/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८४७<br><br>दिनांक -<br><br>११/०२/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.साप्रवि/२/कावि/९०/२०२५ दि.०४/०२/२०२५ अन्वये,मनपाचे सह शहर अभियंता (शहरी दळणवळण विभाग) पदावरील पदोन्नतीस मान्यता देणेबाबत**.** |
| ठराव क्र. ८४७<br><br>दिनांक -<br><br>११/०२/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.साप्रवि/२/कावि/९०/२०२५ दि.०४/०२/२०२५ अन्वये,पिंपरी चिंचवडमहानगरपालिका आस्थापनेवर 'सह शहर अभियंता (शहरी दळणवळण विभाग)' अभिनामाचे ०१ पद पे.लेवल S-२५ वेतनश्रेणी ७८८००-२०९२०० मध्ये शासन मंजूर आहे. 'सह शहर अभियंता (शहरी दळणवळण विभाग)' अभिनामाचे रिक्त पद पदोन्नतीने भरण्याकामी मा. आयुक्तसो यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक ०४/०२/२०२५ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.पीसीस-२०२४/प्र.क्र.८९/नवि-२२ दि.१५ ऑक्टोंबर २०२४ नुसार सह शहर अभियंता (शहरी दळणवळण विभाग) पदोन्नतीच्या निकटतम निम्न |

पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, शिस्तभंग आणि मत्ता व दायित्वाची माहिती, संगणक अर्हता इ. सेवाविषयक तपशील पडताळून ‘सह शहर अभियंता (शहरी दळणवळण विभाग)’ या अभिनामाच्या पदोन्नतीच्या रिक्त जागेवर महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७ मे, २०२१ मधील विनिर्दिष्ठीत बाबी विचारात घेवून मागासवर्गीयांचे पदोन्नतीतील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात न्यायप्रविष्ट विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील अंतिम निर्णय तसेच स्थापत्य अभियंता संवर्गातील सेवाज्येष्ठता व पदोन्नती संदर्भात न्यायप्रविष्ठ असलेल्या सर्व याचिकांमधील अंतिम निर्णयास अधिन राहून खालील अधिका-यांना मा.महापालिका सभेच्या मान्यतेने ‘सह शहर अभियंता (शहरी दळणवळण विभाग)'अभिनामाच्या रिक्त पदांवरपे.लेवल S-२५ वेतनश्रेणी ७८८००-२०९२०० मध्ये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत सदरची समिती सर्वानुमते शिफारस केली आहे.

| अ.क्र | दि.०१/०१/२०२४ रोजीचे सेवाज्येष्ठता यादीतील क्रम | अधिका-यांचे नावं | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | १ | गायकवाड बापू केरबा | ज्येष्ठतेनुसार |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ नुसार महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित आहे. त्यानुसार प्रस्तुतच्या विषयास मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

**निर्णय**

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८४८** **विषय क्रमांक - ८४८**

**दिनांक - ११/०२/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८४८<br>दिनांक - ११/०२/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र..साप्रवि/२/कावि/९१/२०२५ दि.०४/०२/२०२५ अन्वये,मनपाचे कार्यकारी अभियंता (शहरी दळणवळण विभाग)’पदावरील पदोन्नतीस मान्यता देणेबाबत. |

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८४८<br>दिनांक -<br>११/०२/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचे कडील पत्र क्र. साप्रवि/२/कावि/९१/२०२५ दि.०४/०२/२०२५ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'कार्यकारी अभियंता (शहरी दळणवळण विभाग)' अभिनामाचे ०२ पदे पे.लेवल S-२३ वेतनश्रेणी ६७७००-२०८७०० मध्ये शासन मंजूर आहे. 'कार्यकारी अभियंता (शहरी दळणवळण विभाग)' अभिनामाचे रिक्त पद पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्तसो यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक ०४/०२/२०२५ रोजी आयोजित करण्यात आलेली होती.<br><br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० तसेच महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.पीसीस-२०२४/प्र.क्र.८९/नवि-२२ दि.१५ ऑक्टोंबर २०२४ नुसार कार्यकारी अभियंता (शहरी दळणवळण विभाग) पदोन्नतीच्या निकटतम निम्न पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, शिस्तभंग आणि मत्ता व दायित्वाची माहिती, संगणकअर्हता इ. सेवाविषयक तपशील पडताळून 'कार्यकारी अभियंता (शहरी दळणवळण विभाग)' या अभिनामाच्या पदोन्नतीच्या रिक्त जागेवर महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७ मे, २०२१ मधील विनिर्दिष्टीत बाबी विचारात घेवून मागासवर्गीयांचे पदोन्नतीतील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात न्यायप्रविष्ट विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील अंतिम निर्णय तसेच स्थापत्य अभियंता संवर्गातील सेवाज्येष्ठता व पदोन्नती संदर्भात न्यायप्रविष्ठ असलेल्या सर्व याचिकांमधील अंतिम निर्णयास अधिन राहून खालील अधिका-यांना मा.महापालिका सभेच्या मान्यतेने 'कार्यकारी अभियंता (शहरी दळणवळण विभाग) 'अभिनामाच्या रिक्त पदांवरपे.लेवल S-२३ वेतनश्रेणी ६७७००-२०८७०० मध्ये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत सदरची समिती सर्वानुमते शिफारस केली आहे.<br><br><table><tr><th>अ.क्र</th><th>दि.०१/०१/२०२४ रोजीचे सेवाज्येष्ठता यादीतील क्रम</th><th>अधिका-यांचे नावं</th><th>पदोन्नतीचा प्रवर्ग</th></tr><tr><td>१</td><td>१</td><td>पवार सुनिल प्रभाकर</td><td>ज्येष्ठतेनुसार</td></tr></table><br>महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ नुसार महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिके मध्ये निहित आहे. त्यानुसार प्रस्तुतच्या विषयास मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१** |

| | |
|---|---|
| | **(भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८४९** **विषय क्रमांक - ८४९**

**दिनांक - ११/०२/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८४९<br>दिनांक -<br>११/०२/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.हक्षेका/आ५/कावि/१५६/२०२५ दि.०६/०२/२०२५ अन्वये, शहरातील वापरात नसलेले अथवा दुरावस्थेत अथवा मोडकळीस अवस्थेत (Dialpted Condition) असणारे सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांचा सर्व्हे करुन निष्कासित करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८४९<br>दिनांक -<br>११/०२/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.हक्षेका/आ५/कावि/१५६/२०२५ दि.०६/०२/२०२५ अन्वये,स्वच्छ महाराष्ट्र / भारत अभियान (नागरी) प्रकल्प अंमलबजावणी कक्षाकडील मा. आयुक्त साहेब यांचे स्वमअक/३/कावि/१५५/२०२३, दिनांक -१६/१०/२०२३ चे आदेशान्वये कळविलेनुसार केंद्र शासनाचे स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविणेत येत आहे. नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे आणि सर्व नागरिकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. त्यानुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर सर्वेक्षणामध्ये दरवर्षी सहभागी होत असते. मा. आयुक्त सो. यांनी सार्वजनिक व सामुदायिक शौचलय आढावा बैठकीमध्ये वेळोवेळी सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांचा सर्व्हे करुन वापरात नसलेले शौचालय निष्कासित करण्याचे निर्देश दिलेले आहे. स्वच्छ सर्वेक्षणातील ओडीएफ, ओडीएफ++, वॉटर+ याकरिता सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांच्या स्वच्छतेचे मुल्यांकन करण्यात येते. शहरातील एकुण सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांपैकी काही शौचालये ही सिटी प्रोफाईलमध्ये नोंदविणेत आलेली आहेत. त्यामुळे शहरातील जी सार्वजनिक अथवा सामुदायिक शौचालये ज्यांचा अजिबातच वापर होत नाही अथवा दुरावस्थेत अथवा मोडकळीस अवस्थेत (Dialpted Condition) आलेली आहेत त्यांचा सर्व्हे करुन सदर शौचालये निष्कासित करणे आवश्यक आहे.त्यानुसार “ह” क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील जी सार्वजनिक अथवा सामुदायिक शौचालये ज्यांचा अजिबातच वापर होत नाही अथवा दुरावस्थेत अथवा मोडकळीस अवस्थेत (Dialpted Condition) आलेली आहेत त्यांचा सर्व्हे करणेत आला असून ती पुढीलप्रमाणे आहेत. |

| अ. क्र. | वार्ड | शौचालयाचे ठिकाण | ब्लॉक संख्या | सिट्स संख्या | निष्कासित करावयाचे कारण | जागेचा वापर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २० | नाणेकर चाळ पिंपरी पुलाखाली | २ | १५ | शौचालय व मुतारी नादुरूस्त असुन सदर ठिकाणी नागरीक तोडफोड करीत असतात. | सदर जागेमध्ये Pay and Use शौचालय व मुतारी उभारणेत यावे. |
| २ | ३० | श्री. स्वामी समर्थ चौक फुगेवाडी | १ | २० | सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणात वैयक्तीक घरगुती शौचालय आहेत. | सदर जागेमध्ये आरोग्य कार्यालय उभारणी व वैद्यकीय सोयीसुविधांसाठी जागा राखीव ठेवावी. |
| ३ | ३० | लेबर कॅम्प रेल्वे लाईनजवळ फुगेवाडी | १ | १० | सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणात वैयक्तीक घरगुती शौचालय आहेत. | सदर जागेमध्ये 3R सेंटर, आरोग्य व इतर विभाग यांचे कामकाजासाठी ठेवावी. |
| ४ | ३० | रेल्वे लाईन शेजारी दुमजली शौचालय फुगेवाडी | १ | ३२ | सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणात वैयक्तीक घरगुती शौचालय आहेत.सदर ठिकाणी गैरवापर होत | सदर जागेमध्ये वेस्ट वेंडर पार्क उभारणे बाबत कार्यवाही करणेत यावी. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | असतात. | |
| | ५ | ३० | शिंदे यांच्या घराजवळ सिधार्थ नगर दापोडी | १ | ११ | सदर शौचालयाचा स्लॅप कोसळत असुन सदर बांधकाम ३० वर्ष जुने आहे. तसेच सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणात वैयक्तीक घरगुती शौचालय आहेत. | सदर जागेमध्ये सदर जागा 3R सेंटर व आरोग्य विभाग यांचे कामकाजासाठी ठेवणेत यावी. |
| | ६ | ३० | बॉम्बे कॉलनी पवना घाटजवळ दापोडी | १ | १२ | शौचालय निष्कासित करणे (नदीपात्रात असल्यामुळे). | |
| | ७ | ३० | संजयनगर फुगेवाडी | १ | ०३ | शौचालय निष्कासित करणे (रेल्वेची जागा असल्यामुळे). | |
| | ८ | ३० | एम.एस. काटे चाळ एस.टी. रोड दापोडी | १ | ६ | शौचालय जुने असुन नादुरूस्त आहे. | शौचालय दुरूस्ती व नुतणीकरण करणे आवश्यक आहे. |
| | ९ | ३० | तोरणे घरासमोर सिधार्थ भुयाराजवळ दापोडी | १ | १६ | सदर बांधकाम ३० वर्ष जुने व नादुरूस्त आहे. तसेच सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणात वैयक्तीक घरगुती शौचालय आहेत. | सदर जागेमध्ये आरोग्य कार्यालय उभारणे बाबत कार्यवाही करणेत यावी. |
| | १० | ३१ | राजीव गांधी नगर नवी सांगवी | २ | १६ | फायबर शौचालय ८ सीट्स असून ते निष्कासित करावे | सदर ठिकाणी २ पुरुष व २ महिला सीट्सचे RCC बांधकाम करून मिळणे आवश्यक आहे. |
| | ११ | २० | गुडविल चौकजवळ नाल्यालगत MIDC भोसरी | २ | ३ | सुविधा नाहीत | पाणी, ड्रेनेज लाईन सुविधा उपलब्ध करून देणेत येऊन सदर ठिकाणी नवीन RCC बांधकाम करून मिळावे. |
| | १२ | २० | नाशिक हायवे भोसरी पोलीस चौकीजवळ | २ | ४ | सुविधा नाहीत | पाणी, ड्रेनेज लाईन सुविधा उपलब्ध करून देणेत येऊन सदर ठिकाणी नवीन RCC बांधकाम करून मिळावे. |
| | १३ | २० | स्मशानभूमी रोड नेहरूनगर | १ | २ | शौचालय वापर होत नसल्याने. निष्कासित करणे. | |
| | १४ | २० | PMPML डेपो MIDC भोसरी | २ | ४ | सुविधा नाहीत | पाणी, ड्रेनेज लाईन सुविधा उपलब्ध करून देणेत येऊन सदर ठिकाणी नवीन RCC बांधकाम करून मिळावे. |
| | १५ | २० | फोरेशिया कंपनीजवळ MIDC भोसरी | १ | २ | सुविधा नाहीत | पाणी, ड्रेनेज लाईन सुविधा उपलब्ध करून देणेत येऊन सदर ठिकाणी नवीन RCC बांधकाम करून मिळावे. |
| | १६ | २० | सना वजनकाटा जवळ नाल्यालगत MIDC भोसरी | १ | २ | शौचालय व मुतारी फायबरचे आहे. | सदर ठिकाणी नवीन RCC बांधकाम करून मिळावे. |
| | १७ | २० | गुडविल चौक पेट्रोल पंपासमोर भोसरी | २ | ४ | सुविधा नाहीत | पाणी, ड्रेनेज लाईन सुविधा उपलब्ध करून देणेत येऊन सदर ठिकाणी नवीन RCC बांधकाम करून मिळावे. |
| | १८ | ३० | स्मशानभूमी लगत कासारवाडी | १ | ८ | शौचालय नादुरूस्त असुन स्लॅप कोसळत असुन सदर शौचालय जमीन लेवल पासुन १० फुट खाली आहे. | सदर ठिकाणी नवीन RCC बांधकाम करून मिळावे. |
| | १९ | ३० | जनसेवा चौक कासारवाडी | १ | ३ | शौचालय नादुरूस्त असुन फायबरचे आहे. | सदर ठिकाणी नवीन RCC बांधकाम करून मिळावे. |
| | २० | ३० | छत्रपती शिवाजी महाराज पुतळा समोर दापोडी | १ | २ | मुतारी फायबरचे आहे. | सदर ठिकाणी नवीन RCC बांधकाम करून मिळावे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २१ | ३० | सुंदरबाग ऑडिटोरियम भवन समोर रेल्वे स्टेशनजवळ दापोडी | १ | ४ | मुतारी फायबरचे असुन दुरूस्ती करता येत नाही. | सदर ठिकाणी नवीन RCC बांधकाम करून मिळावे. |
| २२ | ३० | सरीता कुंज समोर कासारवाडी | १ | १६ | नदी पात्रात असल्याने निष्कसीत करण्यात यावे | |
| २३ | ३२ | दत्त मंदिर घाट जुनी सांगवी | २ | ३ | मुतारी फायबरचे आहे. | सदर ठिकाणी नवीन दुरूस्ती व नुतणीकरण बांधकाम करून मिळणे आवश्यक |
| २४ | ३२ | अहिल्यादेवी दशक्रिया घाट जुनी सांगवी | १ | ३ | मुतारी फायबरचे आहे. | सदर ठिकाणी नवीन दुरूस्ती व नुतणीकरण बांधकाम करून मिळणे आवश्यक |
| एकुण | | | ३१ | २०१ | | |

उक्त प्रमाणे ह क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील मनपा शौचालये निष्कासित महापालिकेच्या जागेवरील CT/PT/Urinals निष्कासित करणेकामी तसेच त्या जागेचा कोणत्या कारणासाठी वापर करणार आहे याची मा. महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८५०** **विषय क्रमांक - ८५०**

**दिनांक - ११/०२/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८५० दिनांक - ११/०२/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.लेखा/२९/कावि/३२/२०२५ दि.११/०२/२०२५ अन्वये, मनपाचे सन २०२४-२५ चे सुधारीत व २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाचे जमा-खर्चाचे अर्थसंकल्प (''अ''," प'', ''क'' व केंद्र/राज्यशासन पुरस्कृत योजना ) सादर करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८५० दिनांक - ११/०२/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.लेखा/२९/कावि/३२/२०२५ दि.११/०२/२०२५ अन्वये, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९५ नुसार महानगरपालिकेचे सन २०२४-२५ चे व सुधारीत २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाचे जमा-खर्चाचे अर्थसंकल्प ( ''अ''," प'', ''क'' व केंद्र/राज्यशासन पुरस्कृत योजना ) दरवर्षीप्रमाणे २० फेब्रुवारी पुर्वी महापालिका ठरावानुसार मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. तथापि काही अपरिहार्य कारणामुळे सदरचे अंदाजपत्रक अलहिदा सादर करणेत येत असून त्यास मा. महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८५१** **विषय क्रमांक - ८५१**

**दिनांक - ११/०२/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८५१<br>दिनांक -<br>११/०२/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. सविवि/०९/कावि/३७५/२०२५ दिनांक - १०/०२/२०२५ अन्वये, दीअंयो राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गतच्या शहरी बेघरांना निवारा या उपांग अंतर्गत बेघर निवारा केंद्र – २ सुरू करणेकामी तयार करण्यात आलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८५१<br>दिनांक -<br>११/०२/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. सविवि/०९/कावि/३७५/२०२५ दिनांक - १०/०२/२०२५ अन्वये, दीअंयो राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गतच्या शहरी बेघरांना निवारा या उपांग अंतर्गतच्या बेघर व्यक्तींसाठी निवारा केंद्र – २ साठी भूमी जिंदगी विभाग यांनी उपलब्ध करून दिलेल्या पिंपरी भाजी मंडई येथील पहिल्या मजल्यावरील गाळा क्रमांक ४३ ते ४९ = ०७ गाळे व उर्वरित रिक्त गाळे, गाळा क्रमांक ११ ते २६ = १६ गाळे असे एकूण २३ गाळयांच्या ठिकाणी बेघर निवारा केंद्र -२ सुरू करणेसाठी स्थापत्य विभाग, अ क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील दिनांक.२७/०८/२०२४ रोजीच्या पत्रानुसार र.रू. ७३,५०,२०६/- इतक्या रकमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यात आलेला असून, त्यास मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

सही/-
**(चंद्रकांत पोपट इंदलकर)**
**नगरसचिव**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**